# उपविभागीय अधिकारी कार्यालय इचलकरंजी

**48 सहा. निवडणूक निर्णय अधिकारी , 279 इचलकरंजी विधानसभा मतदार संघ तथा**
**उपविभागीय अधिकारी इचलकरंजी यांचे कार्यालय**

ईमेल आयडी – sdoichalkaranji@gmail.com

---

**क्र/लो.नि.२०२४/आ.संहिता/Encore/मेळावा/ 48 /२०२४** **दि. २०/०४/२०२४**

**वाचले – भारत निवडणूक आयोगाकडील पत्र क्रमांक ४६४/INST/२००९/EPS दिनांक १८/०३/२००९ चे निवडणूक प्रचाराकरिता शाळेचे मैदान वापराबाबतचे नियम**

प्रति,
**श्री. प्रमोद शंकर नेजे**
इचलकरंजी शहर काँग्रेस सेवा दल,शहर काँग्रेस कमीटी

विषय :- कार्यकर्ता बैठक व साऊंड परवाना बाबत

संदर्भ :- १) आपला दिनांक १९/०४/२०२४ रोजीचा अर्ज
२) पोलीस निरीक्षक इचलकरंजी पोलीस ठाणे यांचेकडील जा.क्र.३२१ /२०२४ दिनांक २०/४/२०२४ रोजीचे ना-हरकत दाखला
३) पोलीस निरीक्षक शहर वाहतुक नियंत्रण शाखा यांचेकडील जा.क्र./३१९ /२०२४ दिनांक २०/४/२०२४ रोजीचे ना-हरकत दाखला
४) इचलकरंजी महानगरपालिकेकडील आ.चि./परवाना विभाग/ २२/२०२४ दिनांक १९/०४/२०२४ चे नाहरकत प्रमाणपत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्र.१ अन्वये, इचलकरंजी शहर काँग्रेस सेवा दल,शहर काँग्रेस कमीटी इचलकरंजी यांचे वतीने दिनांक २१/०४/२०२४ रोजी सायंकाळी ८.३० ते ९.३० या कालावधीत **बालाजी माध्यमिक हायस्कुल,विक्रमनगर,** इचलकरंजी येथे कार्यकर्ता बैठक आयोजित करण्यात आली असलेने सदर बैठकीस व साउंड परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

**भारत निवडणूक आयोगाकडील वाचले मधिल नियम व त्यामध्ये नमुद अटी / शर्तीस अधिन राहून** व पोलीस निरीक्षक इचलकरंजी पोलीस ठाणे व शहर वाहतुक नियंत्रण शाखा ,इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी यांचेकडील नाहरकत प्रमाणपत्र संदर्भ क्र.२ ते ४ अन्वये प्राप्त झाले असलेने, प्राप्त नाहरकत प्रमाणपत्राच्या अधीन राहून तसेच खालील अटी व शर्तीस अधीन राहून कार्यकर्ता बैठ्क/मेळावा घेणेत यावा.

(मोसमी चौगुले) 20/4/2024
**सहायक निवडणूक निर्णय अधिकारी**
**४८- हातकणंगले लोकसभा मतदार संघ तथा**
**उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी**

**अटी व शर्ती –**

१. सदर कार्यकर्ता मेळावा हा नेमून दिलेल्या वेळेत व ठिकाणी घेणेत यावा.
२. सदर मेळाव्यामध्ये सहभागी होणा-यांनी कार्यक्रमाचे संपुर्ण कालावधीत आक्षेपार्ह अथवा भावना भडकविणारे कृत्य करू नये.
३. सदर मेळाव्याचे कालावधीत शस्त्र किंवा लाठी इ.जवळ बाळगण्यास / प्रदर्शन करण्यास प्रतिबंध आहे.
४. सदर मेळाव्यावेळी कोणताही अनुचीत प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आयोजकांची राहील.
५. सदर मेळाव्यावेळी आचारसंहीतेचा भंग झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आयोजकांची राहील.
६. सदर मेळाव्यामध्ये सहभागी होणा-या लोकांनी सर्वकाळ कर्तव्यावरील पोलीसांचे आदेश पाळावेत.
७. वाहतूकीस अडथळा होणार नाही याबाबतचे नियम पाळावेत. व सदर कार्यक्रमासाठी येणा-या वाहनांसाठी वाहनतळाची व्यवस्था करावी.
८. सदर मेळाव्यावेळी फटाके वाजविण्यास बंदी आहे.
९. लोकसभा निवडणूक आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची आयोजकांनी दक्षता घ्यावी.
१०. कोणत्याही आक्षेपार्ह घटना / व्यक्तव्य करू नये जेणेकरून सांप्रदायिक सलोख्यास बाधा येईल.
११. आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा दैनंदीन खर्च उमेदवार निवडणूक खर्चामध्ये नमुद करणे बंधनकारक आहे.
१२. आयोजकांनी सर्व कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटींग करून एक खिडकी निवडणूक निर्णय अधिकारी व एक सिडी संबंधीत पोलीस स्टेशन यांना सहा तासाचे आत देण्यात यावी.
१३. मा.भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सर्व सुचना / आदेश / नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

Scanned by CamScanner